पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/ ४९६/२०१२
दिनांक- १७/०५/२०१२

प्रति,
मा. .....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २२.५.२०१२ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २२.५.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रतः- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- ७

दिनांक- २२.५.२०१२ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २२/५/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक १५/५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मा.विधी समिती सभा दिनांक ७/५/२०१२ ठराव क्र.७ नुसार, नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २२.५.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मे.ACE Brain सिस्टीम अँड सॉफ्टवेअर, पुणे यांना सन २०१२-१३ मध्ये मनपातील संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्तीचे कामकाज एक वर्ष कालावधीसाठी देण्यास तसेच त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करण्यास व यासाठी येणाऱ्या वार्षिक र.रू.३९,४०,०००/- [र.रू.एकोणचाळीस लाख चाळीस हजार] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २२.५.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मनपाच्या झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/३०-२०११/१२ मधील अ.क्र.२० अन्वये, मिलिंदनगर पूनर्वसन प्रकल्पाअंतर्गत रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.व्हि.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रू.९,३३,६६१/- [र.रू.नऊ लाख तेहतीस हजार सहाशे एकसष्ट] पेक्षा ०.७० % जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.९,४०,१९७/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या झो.नि.पु.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/३०-२०११/१२ मधील अ.क्र.२२ अन्वये, वॉर्ड क्र.३७ व ३८ मधील झोपडपट्ट्यातील रस्त्याचे दुरुस्ती व डांबरीकरण करणेकामी

मे.व्हि.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रू.९,३३,४७४/- [र.रू.नऊ लाख तेहतीस हजार चारशे चौऱ्याहत्तर] पेक्षा ०.७०% जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.९,४०,००८/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ५) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/१२-१३ अन्वये, क प्रभाग कार्यक्षेत्रातील नाले खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करून मोशी कचराडेपो किंवा क प्रभाग कार्यक्षेत्रातील खाणीमध्ये खाली करून पसरून देणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू.५,६६,५६२/- [र.रू.पाच लाख सहासष्ट हजार पाचशे बासष्ट] पेक्षा (-) २ % आणखी १ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत येत असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ६) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/११-१२ मधील अ.क्र.२ अन्वये, पिंपरी-चिंचवड पुनर्वसन प्रकल्पामधील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.बी.डी.यादव (नि.र.रू.९,०४,२३१/- [र.रू.नऊ लाख चार हजार दोनशे एकतीस] पेक्षा ४.९९ % जास्त) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ७) मोकाट व भटक्या कुत्र्याची संख्या नियंत्रित ठेवणेकामी केंद्र शासनाकडील असाधारन राजपत्र क्र.९२९ दि.२४ डिसेंबर, २००१ चे मार्गदर्शक सुचना नुसार महापालिका हद्दीतील मोकाट कुत्र्यावर संतती नियमन शस्त्रक्रिया कामकाजाकरिता याक्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाचे सहकार्याने उपक्रम राबविणे कामी मे.पीपल फॉर ॲनिमल, पुणे यांनी याकामी र.रू.८१०/- [र.रू.आठशे दहा] प्रति नर/मादी शस्त्रक्रिया (कुत्री पकडणे, शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे, खावटी व पाणी देणे, डॉग कॅनल्सची साफसफाई करणे आणि शस्त्रक्रिया झालेनंतर सदरची कुत्री त्यांचे मुळ जागी सोडणे इ.सर्वकामे) इतके शुल्क अदा करणेस व मे.पीपल फॉर ॲनिमल, पुणे यांचेशी आवश्यक करारनामा करणेस व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मा.सेक्रेटरी, अखिल भारतीय महापौर परिषद, नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र.५०५१/AICM दि.१६/४/२०१२ व बिल क्र.३३५, दि.१/४/२०१२ नुसार अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१२-१३ या वर्षाकरिताची वर्गणी र.रू.२०,०००/- [र.रू.वीस हजार] त्यांस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) मनपाच्या वतीने भगवान महावीर जयंती निमित्त शहरातील नागरीकांसाठी दि.५/४/१२ रोजी प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे भजन संध्या जैन ऑर्केस्ट्रा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाचे मानधन मे.मॉमइंडिया (Momindia) यांना र.रू.५२,०००/- [र.रू.बावन्न हजार] अदा करण्यात आले असल्याने झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) करआकारणी व करसंकलन विभागाकडील कॅनन आय.आर. ४५७० प्रिंटर दुरुस्ती कामाची तातडीची गरज विचारात घेता प्राप्त कोटेशन नुसार करारनामा न करता कामकाज करून घेणे आवश्यक असल्याने सदरचे १ कॅनन आय.आर.४५७० प्रिंटर मे.प्रिंट-टेक, सेल्स अँन्ड सर्व्हिसेस-०२ यांचे कडून दुरुस्ती कामकाज करारनामा न करता करणेस व येणाऱ्या र.रू.२८,२००/- [र.रू.अठ्ठावीस हजार दोनशे] चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) पवनानदी ते मुंबई-पुणे लोहमार्ग व महामार्ग यांना ओलांडणारा ॲटो क्लस्टर पर्यंतचा उड्डाणपूल बांधणे कामाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्पाच्या अनुभवानुसार अर्हता धारण केलेल्या एकूण सहा प्रतिनिधीपैकी श्री.एस.आर.तांबे निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांची Dispute Adjudication Board साठी मनपा प्रतिनिधी म्हणून नेमणूक करणेकामी येणाऱ्या र.रू.७,५२,५००/- [र.रू. सात लाख बावन्न हजार पाचशे] अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.८२, ८५, ८७, ८८ व ९० मधील नाले साफ करून गाळाची वाहतुक करणेकामी मे.सिध्दीविनायक ट्रान्सपोर्ट (नि.र.रू.७,६५,०३५/- [र.रू.सात लाख पासष्ट हजार पस्तीस] पेक्षा ३१.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/४९६/२०१२
दिनांक : १७/०५/२०१२ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.